जिल्हा न्यायालय, बुलडाणा
जा.क्र. /विलेशा/ ९३० /२०२६
दिनांक - ०६/०१/२०२६.

शासकीय वाहन क्र. MH-28-C-6677 चा जाहीर लिलाव

(सुचना, अटी व शर्ती)

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांना यांचे कार्यालयीन उपयोगाकरीता यापुर्वी आवंटित करण्यात आलेले शासकिय वाहन क्रमांक एम.एच. -२८-सी-६६७७ (टाटा इंडिगो मांझा) हे या कार्यालयाच्या दिनांक - २८/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निर्लेखित {Condemned} करण्यात आलेले आहे. सदर वाहनाची जाहीर लिलावाव्दारे **'भंगार' (Scrap)** म्हणून विक्री करावयाची आहे. त्याबाबतच्या सुचना, अटी व शर्ती हया पुढील प्रमाणे असतील -

जाहीर लिलाव करावयाच्या वाहनाचा तपशिल	निर्मितीचे वर्ष	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी निर्धारीत केलेले न्युनतम निष्काशन मुल्य
शासकीय वाहन क्र. **MH-28-C-6677** (टाटा इंडिगो मांझा) रंग - पांढरा.	२०१०	१९,४००/-

उपरोक्त वाहनाचे जाहीर लिलावासंबंधीच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे असतील -

१. उपरोक्त नमुद शासकीय वाहनाचा जाहीर लिलाव जिल्हा न्यायालय, बुलडाणा येथील शासकीय परिसरात दिनांक - २०/०१/२०२६ रोजी ठिक सकाळी - ११.०० वाजता सुरू होईल.

२. **वाहनाची लिलावाव्दारे करण्यात येणारी विक्री ही फक्त 'भंगार' (Scrap) म्हणून करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर वाहनाचे कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज किंवा मालकी संदंर्भातील हक्क हस्तांतरणा संबंधीचे कोणतेही कागदपत्रे खरेदीदारास देण्यात येणार नाही. तसेच सदर वाहनाचा उपयोग फक्त आणि फक्त भंगार म्हणून करता येईल. सदर वाहन पुन्हा रस्त्यावर चालविता येणार नाही.**

३. जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यात येणारे वाहन पाहावयाचे असल्यास कार्यालयीन वेळेत दूपारी ३ ते ५ वाजेपर्यंत जिल्हा न्यायालयाचे परिसरात पाहावयास मिळेल.

४. इच्छुकांनी जाहीर लिलावाच्या बोलीमध्ये भाग घेण्यास्तव लिलाव सुरू होण्यापुर्वी आपले नांव, पुर्ण पत्ता यासंबंधी पुरावा देवून अनामत रक्कम रू. १०,०००/- ही सहायक अधिक्षक, वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचेकडे भरणा करून नांव नोंदवावे, त्याशिवाय संबंधीतास लिलावात भाग घेता येणार नाही. ज्यांची बोली स्विकारली नाही त्यांची अनामत रक्कम संबंधितास परत करण्यात येईल.

....२

५. जाहीर लिलावामध्ये सर्वात जास्तीची बोली बोलणा-यास व बोलीची रक्कम सक्षम अधिका-यास योग्य वाटल्यास व ती मान्य झाल्यास संबंधितास बोलीची पूर्ण रक्कम त्याच दिवशी न्यायालयात भरणा करावी लागेल आणि उपरोक्त वाहन स्वखर्चाने जिल्हा न्यायालयाचे परिसरात स्क्रॅप करूनच घेवून जावे लागेल. **तसेच सदर वाहनाचा चेचीस नंबर असलेला तुकडा वेगळा कापून तो या कार्यालयात जमा करावा लागेल.**

६. जाहीर लिलाव झाल्यानंतर त्याबाबतीत कुठलाही हक्क किंवा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७. जाहीर लिलावाव्दारे **'भंगार' (Scrap)**म्हणून विक्री केलेले वाहन कोणत्याही परीस्थितीत किंवा सबबीवर परत घेतले जाणार नाही.

८. **जाहीर लिलावाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर व संबंधित खरेदीराने बोलीची पुर्ण रक्कम जिल्हा न्यायालयात जमा केल्यानंतर उपरोक्त नमुद वाहनाचे सर्व भाग मा. न्यायाधीश महोदयांच्या उपस्थितीत जिल्हा न्यायालय, बुलडाणा येथील परिसरातच अलग-अलग (Dismantle) करून (वाहनाच्या चेचीस नंबर असलेला तुकडा सोडून) नंतरच ताब्यात दिले जाईल व त्यासाठी येणारा सर्व खर्च खेरदीदारास करावा लागेल.**

९. ज्या खरेदीदाराची बोली मान्य झाल्यानंतर त्यांनी कथित बोलीची रक्कम जमा केल्यानंतर त्यांचेकडून रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर उपरोक्त अटी व शर्तींचा भंग होणार नाही याबाबतचे हमीपत्र त्यांस करून देणे आवश्यक राहील. हमीपत्र दाखल केल्यानंतरच वाहन स्क्रॅप करण्या संबंधीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

१०. काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर लिलाव निर्देशित तारखेस न झाल्यास त्याबद्दलची पुढील तारीख व वेळ लिलावाचे दिवशी कळविण्यात येईल. तसेच योग्य किंमत न आल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव लिलावाची कार्यवाही स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०. जाहीर लिलावासंबंधी शासनाने निर्धारीत केलेल्या प्रचलित अटी व शर्ती हया या लिलावा संबंधी सुध्दा लागू राहतील.

११. सदर नोटीसची बजावणी ही जिल्हा न्यायालय, बुलडाणा येथील नोटीसबोर्डावर करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच जिल्हा प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदर नोटीस जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे अधिकृत संकेतस्थळावर जाहीर लिलावामध्ये भाग घेण्यास ईच्छुक असणा-यांकरिता उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

१२. याव्यतिरिक्त मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांनी वेळेवर सुचविलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

DISTRICT & SESSIONS COURT BULDANA

06/01/2026

(आर. एन. रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.